RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २१] सोमवार, जुलै २०, २०२६/आषाढ २९, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.—भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.	**पृष्ठे** १-३

दिनांक १० जून २०२६ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सुप्रिया धावरे,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २० जुलै २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९३२ चा ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

२. भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२, (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ५८ मधील ,— १९३२ चा ९.

(१) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः—

"(१) पोट-कलम (१क) च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या क्षेत्रात पेढीच्या धंद्याची कोणतीही जागा स्थित असेल किंवा करण्याचे योजलेले असेल त्याच्या निबंधकाकडे अधिकृत संकेतस्थळावर,—

(क) पेढीचे नाव, पेढीचा पॅन क्रमांक व ई-मेल पत्ता ;

(ख) पेढीच्या धंद्याचे स्वरूप ;

(ग) पेढीच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा ;

(घ) पेढी जेथे धंदा चालवत असेल अशा अन्य कोणत्याही जागांची नावे ;

(ङ) प्रत्येक भागीदार पेढीमध्ये सामील झाल्याचा दिनांक ;

(च) सर्व भागीदारांची संपूर्ण नावे व कायमचे पत्ते, ई-मेल पत्ते आणि भ्रमणध्वनी क्रमांक;

(छ) पेढीचा कालावधी,

हे विहित नमुन्यातील ऑनलाइन निवेदन, विहित ऑनलाइन फी भरून आणि भागीदारी विलेखाची सत्यप्रत देऊन, विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज करून पेढीची नोंदणी करता येईल.

निवेदन सर्व भागीदारांकडून किंवा त्याबाबत विशेषतः प्राधिकृत करण्यात आलेल्या त्यांच्या अभिकर्त्यांकडून डिजिटलरीत्या स्वाक्षरित करण्यात येईल.".

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

"(२) निवेदन डिजिटलरीत्या स्वाक्षरित करणारे भागीदार अधिकृत संकेतस्थळावर माहिती टाकतील, तसेच पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या ऑनलाइन नमुन्यात नोंदविलेले निवेदन सत्यापितही करतील. अर्जदाराकडून आवश्यक सहपत्रे देखील अधिकृत संकेतस्थळावर टाकतील.".

सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५९ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ च्या पोट-कलम (१) मध्ये "नोंदवहीत निवेदनाची" या मजकुरानंतर, "डिजिटल रीतीने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये "प्रमाणित केलेली" या मजकुरानंतर, "ऑफलाइन किंवा ऑनलाइन" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.